# नोटीस

जा.क्र.डॉबासाकोकृवि/परीक्षा—ह/716/२०२१
डॉ.बा.सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
दिनांक :— 12 MAY 2021

विषय :— डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत उच्चस्तर कृषि शिक्षण शाखेकरीता '२ कार्यालय सहाय्यक' व नियंत्रक शाखेकरीता (लेखा—३) '१ कार्यालय सहाय्यक' यांची ठेका पध्दतीने नेमणूक करणेबाबत...

उच्चस्तर कृषि शिक्षण शाखेतील कार्यालयीन कामकाजात मदत करणे, तसेच उपकुलसचिव व अधिक्षक यांनी वेळोवेळी सुचविलेली कामे कार्यालयीन वेळेत करण्यासाठी तसेच नियंत्रक शाखेतील (लेखा—३) कार्यालयीन कामकाजात मदत करणे, अधिक्षक (लेखा—३) यांनी वेळोवेळी सुचविलेली कामे कार्यालयीन वेळेत करण्यासाठी खालील अटी व शर्ती पुर्ण करणाऱ्या एकूण '३ कार्यालय सहाय्यकांची' ठेका पध्दतीवर आवश्यकता आहे.

अटी व शर्ती :—

१) उमेदवार हा मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.
२) MS-CIT संगणकिय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
३) मराठी टंकलेखन ३० शप्रमि आणि इंग्रजी टंकलेखन ४० शप्रमि उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
४) विद्यापीठातील कार्यालयीन कामकाजाचा/उच्चस्तर कृषि शिक्षण व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
५) सदर ठेका **अकरा महिने कालावधीकरीता** राहील. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा ठेका पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
६) ठेका पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपवलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.
७) ठेका पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
८) संबधित उमेदवारांला ठेका संपण्यापूर्वी सदर ठेका रद्द करावयाचा असल्यास त्याने तशी १ महिना आगाऊ लेखी सूचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास १ महिन्याचे मानधन वसूल करण्यात येईल.
९) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायमस्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.
१०) उमेदवारांना दर दोन महिन्यासाठी एक नैमित्तिक रजा आणि कार्यालयीन सुट्टयांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही रजा अनुज्ञेय असणार नाही.

वरीलप्रमाणे ठेका पध्दतीवर काम करण्यासाठी उमेदवार पुरवू इच्छिणाऱ्या ठेकेदारांनी उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, टंकलेखन व संगणकीय अर्हता, कामकाजाचे अनुभव, इतर अर्हता आणि उपरोक्त कामे करण्यासाठी अपेक्षित दरमहा एकत्रित मानधन इत्यादी नमूद करून दरपत्रक दिनांक २४.०५.२०२१ पर्यंत निम्नस्वाक्षरीकार कार्यालयात सादर करावेत. ठेका पध्दती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार उपकुलसचिव यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. **शैक्षणिक पात्रता, संगणक अर्हता, तसेच विद्यापीठ कामाचा अनुभव या बाबी ठेका निश्चित करताना विचारात घेतल्या जातील.**

उपकुलसचिव
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण
कृषि विद्यापीठ, दापोली.

प्रत सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी:—
१. विद्यापीठ संकेतस्थळावर
२. नोटीस बोर्डवर

F:\Table – H\FY 2021-22\Noting Table-H 21-22